# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)

**" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१**

| कार्यालय | दूरध्वनी | Website : http://arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : miscall.18@gmail.com |
| --- | --- | --- |
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१०३१-३६ | फॅक्स् दूरध्वनी ०२२-२२६२०२३४/२२६२१०३४ (संचालक) |
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१००६ | ०२२-२२६७९०४४ (सहसंचालक (रुग्णालये) |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६११४७१ | ०२२-२२६२२१५५ (मुख्य प्रशासकीय अधिकारी) |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६२०२४९ | ०२२-२२७०३७८५ (नियंत्रण कक्ष) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | ०२२-२२६२१०४७ (अंधत्व) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | ०२२-२२६२५७९९ (खरेदी कक्ष) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६७५५ | |
| | | **जा.क्र.संआसे/विवाह नोंदणी/कक्ष१८/ 3863-78 /१६.**<br>**दिनांक : 21/ ०४ /२०१६.** |

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

१) कार्यकारी अधिकारी तथा विवाह निबंधक,
बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई

२) आरोग्य अधिकारी तथा विवाह निबंधक, महानगर पालिका (सर्व)

३) प्रशासक तथा विवाह निबंधक, कटक मंडळ (सर्व)

४) मुख्य अधिकारी तथा विवाह निबंधक, नगर परिषद/पालिका (सर्व)

५) प्रशासक तथा विवाह निबंधक, नगर पंचायत (सर्व)

६) ग्राम सेवक/ ग्राम विकास अधिकारी तथा विवाह निबंधक, ग्राम पंचायत (सर्व)

**(मार्फतः- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद)**

**विषयः- विवाह नोंदणी बाबत मार्गदर्शक सूचना...**

संदर्भः- १) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८
२) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,१९९९

महाराष्ट्रातील सर्व भागास महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,१९९९ लागू आहे. विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ व नियम,१९९९ यांच्या प्रति सर्व संबंधित विवाह निबंधकांना या कार्यालयाचे पत्र क्र.संआसे/विवाह नोंदणी/कक्ष१८/२७४४/२८५७/१६ दिनांक १७.०३.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम,१९९८ व महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम,१९९९ मधील वैधानिक तरतुदीनुसार खालील सुचनांची पालन करावे.

१) विवाहाची नोंदणी अधिनियमाचे कलम ६(१) व नियम ५ अन्वये **वधू किंवा वर, ज्या ठिकाणी राहतात, त्यापैकी एका विवाह निबंधकाचे कार्यालयात नोंदवावयाचे आहे**. विवाहाचे ठिकाण, ज्या विवाह निबंधकाचे कार्यालयाचे कक्षेत येते त्या ठिकाणी नोंदवयाचे नाही. सदर विवाहाची नोंदणी यापुर्वी कोणत्याही निबंधकाकडे झालेली नसल्याबाबत शपथपत्र घ्यावे, जेणेकरुन दुबार नोंदी होणार नाहीत.

Scanned with OKEN Scanner

२) विवाह ज्ञापन (नमुना ड) मध्ये स्वतः (in person) हजर करण्याची जबाबदारी वराची आहे या सोबत नमुना (नमुना ड) जोडला आहे. विवाह ज्ञापन कोणत्याही इसमा मार्फत अथवा पोस्टाने पाठविता येणार नाही. अशी विज्ञाप्ती पोस्टाने आल्यास संबंधित पक्षकारास परत करावी आणि कलम ६ प्रमाणे **वधू-वर आणि ३ साक्षीदार यांचेसह विवाह नोंदणीसाठी विवाह निबंधकाचे कार्यालयात समक्ष हजर राहणे** बाबत कळवावे.

३) विवाहाची नोंदणीचे ज्ञापन **विवाहाचे तारखेपासून ९० दिवसाचे आत हजर करणे जरुरी आहे**. जनरल क्लॉजेस अ‍ॅक्ट, १९०४ प्रमाणे ९० दिवसाची मुदत, विवाहाचा दिवस सोडून मोजावयाचे आहे. उदा. विवाह दिनांक ०२ जानेवारी २०१६ रोजी झाले असल्यास सदरची विज्ञाप्ती शास्तीशिवाय दिनांक ०१ एप्रिल २०१६ पर्यंत हजर करता येईल त्यावर फक्त ज्ञापन फी रुपये १५/- व विवाह नोंदणी शुल्क रु.५०/- असे एकूण रु.६५/- इतके आकारता येईल.

४) उशिरा हजर केलेल्या विज्ञाप्ती बद्दल आकारावयाची शासकिय फी रु.१५/- अधिक विवाह नोंदणी शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात यावे.

अ) विवाहाची नोंदणीचे ज्ञापन नमुना ड, विवाहाचे तारखेपासून ९० दिवसानंतर परंतू १ वर्ष पुर्ण होण्यापुर्वी ज्ञापन फी रुपये १५/- व विवाह नोंदणी शुल्क रु.१००/- असे एकूण रु. ११५/- इतके आकारता येईल.

ब) विवाहाची नोंदणीचे ज्ञापन नमुना ड, विवाहाचे तारखेपासून १ वर्ष झाल्यानंतर ज्ञापन फी रुपये १५/- व विवाह नोंदणी शुल्क रु.२००/- असे एकूण रु.२१५/- इतके आकारता येईल.

५) विवाह नोंदणीबाबत आकारावयाची फी खालीलप्रमाणे.

| अनु. | नियम | बाब | शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ५ (२) | विवाह शास्त्रोक्त पध्द्तीने झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | ५०/- |
| २ | ७ (१) | विवाह शास्त्रोक्त पध्द्तीने झाल्यानंतरच्या ९० दिवसानंतर परंतु १ वर्ष पुर्ण होण्यापूर्वी विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | १००/- |
| ३ | ७ (२) | विवाह शास्त्रोक्त पध्द्तीने झाल्यानंतर १ वर्षाहून वा त्याहून अधिक कालावधीने विवाह नोंदणी ज्ञापन सादर केल्यास आकारण्यात येणारे विवाह नोंदणी शुल्क | २००/- |
| ४ | ११ (१) | विवाह नोंदवही तपासण्यासाठीच्या अर्जासाठी सोबत द्यावयाचे शुल्क | १५/- |
| ५ | ११ (२) | विवाह नोंदवहीतील उतारांची प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी अर्जासोबत द्यावयाचे शुल्क | २०/- |

६) विवाह नोंदणीसाठी वधू-वरांना फोटो आय-डी उदा. आधार कार्ड, व्होटर कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स इ. आणि वयाचा पुरावा उदा. जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व राहण्याचा पुरावा उदा. रेशन कार्ड, वीजबिल, टेलिफोन बिल, पासपोर्ट इ. विज्ञाप्ती सोबत जोडणे आवश्यक आहे. त्याच बरोबर लग्नपत्रिका (लग्नपत्रिका उपलब्ध नसल्यास, रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र), लग्नाचे फोटोग्राफ्स विज्ञाप्ती सोबत सादर करावयाचे आहे.

७) वधू किंवा वर या पैकी एखादी व्यक्ती घटस्फोटीत असल्यास, घटस्फोटाच्या आदेशाची प्रत विज्ञाप्ती सोबत घेण्यात यावी.

८) वधू किंवा वर या पैकी एखादी व्यक्ती विधवा/विधूर असल्यास, पुर्वीच्या जोडीदाराचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रत विज्ञाप्ती सोबत घेण्यात यावी.

९) विवाह नोंदणीच्या वेळी वधू किंवा वर, अज्ञान असल्यास पोलिस विभागाला पत्राव्दारे कळवावे. पोलिस विभागाकडून या प्रकरणी उचित कार्यवाही झाल्यानंतर नोंदणीची प्रक्रिया पुर्ण करावी.

Scanned with OKEN Scanner

१०) विज्ञाप्ती सोबत वधु-वरांचे प्रत्येकी ५ छायाचित्र (१-विज्ञाप्ती ड, २-विवाह प्रमाणपत्र (२ प्रती) ३-गोषवारा ४-विवाह नोंदणीची नोंदवही) व तीन साक्षीदाराचे प्रत्येकी २ छायाचित्र (१-विज्ञाप्ती ड, २-विवाह नोंदणीची नोंदवही) यासाठी घेण्यात यावे. वधु-वर व तीन्ही साक्षीदारांचे छायाचित्रासोबत यथोचित ठिकाणी स्वाक्षरी व अंगठयाचा ठसा घेणे आवश्यक आहे.

११) विवाह ज्ञापन सादर केल्यानंतर आणि त्याची पडताळणी केल्यानंतर वधु-वर आणि साक्षीदार यांच्या ओळखीबाबत खात्री करुन घेतल्यानंतर विवाह निबंधकाने नमुना-इ मध्ये विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र व्दैभाषिक (bilingual) इंग्रजी व मराठी भाषेत देण्यात यावे.

१२) निबंधकाच्या मते ज्ञापनामध्ये देण्यात आलेला तपशील आणि पक्षकारांनी आणि साक्षीदारांनी सादर केलेले दस्तऐवज आणि कागदपत्र पक्षकारांची किंवा दोघांचीही ओळख निःसंशयपणे शाबीत करु शकत नाहीत तर, निबंधकास, नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी निबंधकाकडून आवश्यक ठरविण्यात येतील असे दस्तऐवज किंवा कागदपत्रे पुरविण्याचा, पक्षकारांना वाजवी वेळ देऊन, पक्षकारांना निर्देश देता येईल. अशी कागदपत्रे आणि दस्तऐवज पुरविण्यात आल्यानंतर, अशा दस्तऐवजांची किंवा कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर, खात्री करुन घेऊन निबंधकास , नमुना मधील विवाह नोंदणी प्रमाणपत्र देता येईल.

१३) पक्षकारांच्या किंवा साक्षीदारांच्या ओळखीबद्दल किंवा ज्ञापनामध्ये देण्यात आलेल्या निवेदनाच्या अचूकपणा बद्दल निबंधकाची खात्री पटली नसेल त्या बाबतीत, निबंधकास, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि कारणे लेखी नमूद केल्यानंतर, विवाहाची नोंदणी करण्यास नकार देणारा आदेश काढता येईल, नकाराचा आदेश नमुना 'फ' मध्ये देण्यात यावे.

१४) विवाहाची नोंदणी केल्यानंतर त्या निबंधकाने त्याबद्दलचे नियम ५ मध्ये नमूद केलेले विवाह प्रमाणपत्र (नमुना इ) सोबत जोडले आहे. पक्षकारास कोणतीही फी न आकारता ताबडतोब दयावे आणि त्याची दुसरी प्रत (डुप्लीकेट) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, नविन प्रशासकिय इमारत, तळ मजला, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालयास पाठवावी.

१५) या कायद्यान्वये विवाहाची नोंदणी केली जाणार आहे. त्यामुळे विज्ञाप्तीवर फाईल करण्याचा शेरा लिहीता येणार नाही. विज्ञाप्तीवर कोणत्याही प्रकारचा शेरा लिहिण्याची तरतूद अधिनियमात अथवा नियमात नाही, परंतु नोदलेल्या विवाहाचे प्रमाणपत्रात तशी तरतूद आहे.

१६) विवाहाची नोंदणी करण्यात आलेल्या विज्ञाप्तीची नोंद, विवाह नोंदवही (नमुना - ई) मध्ये ताबडतोब करावयाची आहे. सदर नमुन्यातील शेरा (रकाना १०) मध्ये नोंदणी क्रंमाक, खंड क्रंमाक व पृष्ठ क्रमांक नमुद करावेत.

१७) विवाह विज्ञाप्ती व्दारे जमा होणारी फी खाली दिलेल्या लेखाशिर्ष मध्ये जमा करण्यात यावी

मुख्य शिर्षक - ००३० मुद्रांक व नोंदणी फी
उप शिर्षक - ०३ नोंदणी
उप गौण लेखा - ८०० - इतर जमा - ००३००१६१
०६ - विवाह अधिनियम अन्वये वसूल केलेली फीस्

१८) विवाह निबंधक एखादया विवाह मंडळाच्या नोंदणीचा किंवा नवीनीकरण्याचा प्रत्येक अर्ज आणि त्याला मिळालेले प्रत्येक ज्ञापन सुरक्षित अभिरक्षेत ठेवील. असा अर्ज किंवा ज्ञापन ते मिळाल्याच्या तारखेपासून साठ वर्षाच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल आणि एखादया न्यायालयाचा लेखी आदेश असल्याखेरीज ते त्याच्या कार्यालयातून हलविण्यात येणार नाही.

१९) निबंधकाने त्याचे कार्यक्षेत्रातील विवाह मंडळाची नोंदणी व विवाह नोंदणी बाबतचे अभिलेख आणि कागदपत्रे खालील दिलेल्या कालावधीत संपल्यानंतर नष्ट करावे.

| अ.क्र. | अभिलेखाचे नांव | जतन करावयाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | पावती पुस्तक | पाच वर्षे |
| २ | महानिबंधकांना पाठविलेल्या निर्देशांचे संबंधातील टपाली पोहच पावत्या | पाच वर्षे |
| ३ | नोंदवहीमधील उताऱ्यासाठीचे अर्ज | पाच वर्षे |
| ४ | रोकड वही | पाच वर्षे |
| ५ | कोरी पुस्तके व नमुने याचा हिशोब | तीन वर्षे |

Scanned with OKEN Scanner

२०) विवाह निबंधकाने त्याचे कार्यक्षेत्रातील विवाह मंडळाची नोंद प्रत्येक वर्षाच्या नोंदवही नमुना 'ह' मध्ये व विवाहाची नोंद प्रत्येक वर्षाची विवाह नोंदवही नमुना 'ई' मध्ये ठेवावी.

ग्रामिण व शहरी भागातील सर्व विवाह निबंधक यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या **कार्यक्षेत्रातील सर्व विवाहांची नोंदणी नियमातील वैधानिक तरतुदींच्या अधिन राहुन करुन घ्यावी.**

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या परिपत्रकाची प्रत ग्रामिण भागातील विवाह निबंधकांना संबंधित गट विकास अधिकारी यांचे मार्फत देण्यात यावी, तसेच शहरी भागातील विवाह निबंधकांना आपले कार्यालयाकडून पुरविण्याची तजवीज करावी. जिल्हयातील सर्व विवाह निबंधकांना या परिपत्रकाची प्रत मिळाल्याची पोच घेण्यात यावी.

**संचालक आरोग्य सेवा तथा**
**निबंधक विवाह (राज्यस्तर)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत सादर :-

१) मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा.अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा.अप्पर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत सस्नेह :-

१) आयुक्त राजस्व विभाग (सर्व)
२) आयुक्त महानगर पालिका (सर्व)
३) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, नविन प्रशासकिय इमारत, तळ मजला, महाराष्ट्र राज्य, पुणे १
४) जिल्हाधिकारी (सर्व)
५) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)
६) उप संचालक आरोग्य सेवा आरोग्य मंडळ (सर्व)

प्रत :- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ............ (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी.

Scanned with OKEN Scanner

## FORM 'D' / नमुना 'ड'
## MEMORANDUM OF MARRIAGE
## विवाहाचे ज्ञापन

[See Section 6 and rule 5 / पहा कलम ६ आणि नियम ५]

1. Date of Marriage :............................................................
   विवाहाचा दिनांक :

2. Place of Marriage ( With full Particulars) :............................................................
   विवाहाचे ठिकाण (संपूर्ण तपशिलासह) :

3. Personal law according to which the marriage between the parties was solemnized :............................................................
   पक्षकारांमधील विवाह ज्या व्यक्तिगत कायद्यान्वये विधी संपन्न झाला तो कायदा :

4. **Details of Husband / वराची संपुर्ण माहिती**

Photo of Husband

Thumb

a) Full Name of the Husband

| Surname | Name | Father Name |
|---|---|---|

पतीचे संपूर्ण नांव

| आडनाव | नाव | वडिलांचे नाव |
|---|---|---|

UID No.
आधार क्र.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

b) Other Name/s (if any) Which the husband known :............................................................
   पतीला दुसऱ्या नावाने (कोणतेही असल्यास) ओळखत असल्यास ते नांव / ती नावे :............................................................

c) Religion (i) By Birth :............................................................
   (ii) By adoption (if any) :............................................................
   धर्म (१) जन्माने :
   (२) दुसरा धर्म स्वीकारला असल्यास (कोणताही असल्यास) :

d) Age as on the date of Solemnization of marriage :.......................... Years ....................Months
   विवाह विधी ज्या तारखेस संपन्न झाला असेल त्या तारखेस असलेले वय :.......................... वर्ष ...................... महिना

e) Occupation along with Office address. :............................................................
   व्यवसाय कार्यालयाच्या पत्त्यासह :............................................................

f) Status at the time of marriage : Unmarried / Widower / Divorced
   विवाहाच्या वेळची स्थिती : अविवाहीत / विधुर / घटस्फोटित

g) Full address of the husband :............................................................
   पतीचा संपूर्ण पत्ता :............................................................

h) Signeture of the Husband With date :............................................................
   पतीची तारखेसह स्वाक्षरी :

Scanned with OKEN Scanner

5. **Details of Wife / वधुची संपुर्ण माहिती**

a) Full Name of the Wife

| Surname | Name | Father Name |
|---|---|---|
| | | |

पत्नीचे संपूर्ण नांव

| आडनाव | नाव | वडिलांचे नाव |
|---|---|---|
| | | |

UID No.
आधार क्र.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

Photo of Wife

Thumb

b) Other names /s (if any) by Which the wife is known : ............................................................
पत्नीला दुसऱ्या नावाने (काणतेही असल्यास): ............................................................
ओळखत असल्यास ते नांव / नावे

c) Religion (i) By Birth : ............................................................
(ii) By adoption (if any)
धर्म (१) जन्माने : ............................................................
(२) इतर धर्म स्वीकारला असल्यास (कोणताही असल्यास) :

d) Age as on the date of Solemnization of marriage : ..................... Years.................. Months
विवाह विधी ज्या तारखेस संपन्न झाला असेल त्या तारखेस असलेले वय :............... वर्ष .............. महिना

e) Status at the time of marriage : Unmarried / Widow / Divorced
विवाहाच्या वेळची स्थिती : अविवाहीत / विधवा / घटस्फोटीत

f) Full address of the wife before of at the time of marriage : ............................................................
विवाहाच्या पूर्वीचा अथवा वेळचा पत्नीचा पुर्ण पत्ता : ............................................................

g) Signeture of the wife with date : ............................................................
पत्नीची तारखेसह स्वाक्षरी : ............................................................

6. **Witness / साक्षीदार**

1) i) Name : ............................................................

नांव : ............................................................

UID No.
आधार क्र.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

Photo of Witness 1

Thumb

ii) Adress : ............................................................

पत्ता : ............................................................

iii) Occupation and office address : ...............................................

व्यवसाय आणि कार्यालयाचा पत्ता :...............................................

iv) Relation (if any) :
विवाहीत जोडप्याशी असलेले नाते (कोणतेही असल्यास) :...............................................

v) Signature with date : ...............................................
तारखेसह स्वाक्षरी :

Scanned with OKEN Scanner

2) i) Name : ..........................................................................

नांव : ..........................................................................

UID No.
आधार क्र.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

ii) Adress : ..........................................................................
पत्ता : ..........................................................................

Photo of Witness 2

iii) Occupation and office address : ..................................................
व्यवसाय आणि कार्यालयाचा पत्ता :..................................................

Thumb

iv) Relation (if any) : ..................................................
विवाहीत जोडप्याशी असलेले नाते (कोणतेही असल्यास) :

v) Signature with date : ..................................................
तारखेसह स्वाक्षरी :

3) i) Name : ..........................................................................

नांव : ..........................................................................

UID No.
आधार क्र.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

ii) Adress : ..........................................................................
पत्ता : ..........................................................................

Photo of Witness 3

iii) Occupation and office address : ..................................................
व्यवसाय आणि कार्यालयाचा पत्ता :..................................................

Thumb

iv) Relation (if any) : ..................................................
विवाहीत जोडप्याशी असलेले नाते (कोणतेही असल्यास) :

v) Signature with date : ..................................................
तारखेसह स्वाक्षरी :

7. Priest / पुरोहित

a) Name of the Priest : ..........................................................................
पुरोहिताचे नांव :

b) Full Address : ..........................................................................
पूर्ण पत्ता :

c) Religion / धर्म : ..........................................................................

d) Age / वय : ..................................................

e) Signature with date : ..................................................
तारखेसह स्वाक्षरी :

8. Documents presented along with this Memorandum :

1) .................................................. 4) ..................................................

2) .................................................. 5) ..................................................

3) .................................................. 6) ..................................................

❖ **सदर विवाहाची नोद वराकडे / वधुकडे करण्यात आलेली नाही (नको असलेले खोडावे)**

9. Date of Submission to registrar : ..................................................
निबंधकाकडे सादर केल्याचा दिनांक :

**N.B. :** Any person making any statement or declaration in the memorandum which is false in any material particular or submits any documents which he/she known or has reason to believe to be false shall be liable for penal action under section 12

**टिप :** कोणत्याही व्यक्तीने ज्ञापनामध्ये केलेले विधान किंवा प्रतिज्ञापत्र जे खोटे असेल अथवा सादर केलेला कोणताही दस्तऐवज, जे खोटे असल्याचे त्याला / तिला माहित असेल अथवा जे खोटे असल्याचे मानण्यास कारण असेल, तो / ती व्यक्ती कलम १२ अन्वये दंडनीय कारवाईस पात्र ठरेल.

Scanned with OKEN Scanner

वराचा फोटो

वधुचा फोटो

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

विवाह नोंदणी कार्यालय ........................................

Marriage Registion Office...................................................

तालुका.................... जिल्हा .................., महाराष्ट्र, भारत

Taluka .................. District ........................, Maharashtra, India

---

**नमुना-'इ'/Form 'E'**

# विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र

## Certificate of Registration of Marriage

[पहा कलम ६(१) आणि नियम ५/See Section 6(1) and Rule 5]

प्रमाणित करण्यात येते की, पतीचे नांव ......................................................

आधार क्र. | | | | | | | | | | | | | राहणार :...................................

.......................... आणि पत्नीचे नांव :....................................................

आधार क्र. | | | | | | | | | | | | | राहणार...................................

..........................यांचा विवाह दिनांक ..../..../२०.....रोजी ......................

.......................... (ठिकाणी) येथे विधी संपन्न झाला. त्याची महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८ अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवही च्या खंड क्रमांक ..... च्या अनुक्रमांक ......... वर दिनांक...../...../२०.... रोजी माझ्याकडून नोंदणी करण्यात आली आहे.

Certified that Marriage between, Husband's name: ..............................................

UID No. | | | | | | | | | | | | | Residing at............................................

............................................ and Wife's name.................................................

UID No. | | | | | | | | | | | | | Residing at ............................................

..........................................................................Solemnized on ....../....../20...... at

.................. .................................(place) is Registered by me on ...../..... /20.....

at Serial No: .......... of Volume ............ of register of Marriages maintained under the Maharashtra Regulation of Marriage Bureaus and Registration of Marriages Act,1998.

Place:

Date :

SEAL

Signature

Registrar of Marriages

Marriage Office,................

Scanned with OKEN Scanner